# मारुती स्तोत्र - १

भीमरुपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती ।
वनारी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना ।।१।।

महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळें ।
सौख्यकारी, दुःखहारी, धूर्त वैष्णवगायका ।।२।।

दीनानाथा हरीरुपा, सुंदरा जगदांतरा ।
पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना ।।३।।

लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला, पावना परितोषका ।।४।।

ध्वजांगें उचली बाहो, आवेशे लोटला पुढें ।
काळाग्नि काळरुद्राग्नि, देखतां कांपती भयें ।।५।।

ब्रह्मांडें माइलीं नेणों, आवळे दंतपंगती ।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा, भृकुटी त्राटिल्या बळें ।।६।।

पुच्छ तें मुरडिलें माथां, किरीटी कुंडलें बरीं ।
सुवर्ण कटि कांसोटी, घंटा किंकिणि नागरा ।।७।।